
सोनेरी
वासरूं
पी.व्ही.भानुशाली
सुंदर साहित्य-प्रकाशन,
पुणें २.
एम. एस. केरकर

सो ने री वा स रूं

(चमत्कारपूर्ण घटनांनीं भरलेली नवलकथा)

-: लेखक :-
पी. व्ही. भानुशाली

रम्यकथा प्रकाशन,
५९२ नारायण पेठ, काम्हेरे बिल्डिग, पुणें ३०

किमत ५० पैसे

प्रकाशक :
वा. ग. मेहेंदळे
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ, पुणें ३०.

[पुनर्मुद्रणादिक सर्वाधिकार प्रकाशकाच्या स्वाधीन]

प्रथमावृत्ति : सप्टेंबर १९६४
द्वितीयावृत्ति : फेब्रुवारी १९६९
तृतीयावृत्ति : जानेवारी १९७२

मुद्रक :
वा. ग. मेहेंदळे
जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ, पुणे २.

सोनेरी वासरूं

तीन वृद्ध

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. अरब देशांत एक धनाढ्य व्यापारी रहात होता. त्यानें स्वकष्टानें पुष्कळ धन-संपत्ति मिळविली होती आणि आपली पत्नी व मुलां-बाळांसह तो सुखासमाधानांत रहात होता. एकदां त्याच्या-वर कांहीं कामानिमित्त दूर देशीं जाण्याचा प्रसंग आला. त्याला ज्या गांवीं जायचें होतें तेथें जाण्याचा मार्ग अतिशय कष्टदायक होता.

बहुतेक प्रवास वाळवंटांतून होणार असल्यामुळें तो उंटावर स्वार होऊन निघाला. आपल्याबरोबर त्यानें पुष्कळसे खाद्यपदार्थ आणि पिण्याच्या पाण्याचा सांठा घेतला होता.

प्रवासांतील अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देऊन

तो एकदांचा कसाबसा आपल्या इच्छित स्थळीं पोहोंचला. सुमारें दोन महिन्यांत त्यानें आपलें काम उरकलें आणि तो परत आपल्या घरीं येण्यास निघाला.

कांहीं दिवस प्रवास केल्यानंतर तो वाळवंटाच्या रखरखीत प्रदेशांत येऊन पोहोंचला. भर दुपारीं डोक्यावर सूर्य तळपत होता. कडक उन्हानें वाळू तापलेली होती आणि तिची झळ साऱ्या अंगाला पोळत होती.

परिश्रमानें थकलेला आणि घामाघूम झालेला तो व्यापारी विश्रांति घेण्यासाठीं एके जागीं थांबला. थोडा विसांवा घेतल्यानंतर त्यानें आपल्या पिशवींतून खजूर काढले आणि खाऊं लागला. मोठ्या तन्मयतेनें खजूर खात त्यानें बिया इकडेतिकडे फेंकण्यास प्रारंभ केला.

खजूर खाऊन झाल्यानंतर तो पोटभर पाणी पिऊन तृप्त झाला, आणि थोडा वेळ विसांवला. अचानक त्याच वेळीं मोठें वादळ सुरू झालें. सोसाट्याच्या वाऱ्यानें सर्वत्र वाळू उधळली. त्या अकल्पित संकटांत सांपडून बिचाऱ्या व्यापाऱ्याची त्रेधातिरपीट उडाली. कांहीं वेळानें वादळ शांत झालें आणि काय आश्चर्य; एक अजस्त्र दैत्य हातांत तलवार घेऊन व्यापाऱ्याच्या अंगावर चाल करून येत म्हणाला, 'अरे पाप्या, नराधमा, माझ्या लाडक्या एकुलत्या एक पुत्राची हत्त्या करून तूं कुठें जाशील ? चल, देवाचें नांव घे आणि मृत्यूला तयार हो.'

दैत्याच्या त्या अकल्पित आक्रमणानें व्यापारी थंडगार पडला. काय करावें तें त्याला सुचेना. दैत्याचा तो अजस्त्र देह पाहून त्याची वाचाच कुंठली. तरीसुद्धां प्रसंगावधान राखून तो चांचरत दैत्याला म्हणाला,

'दैत्यराज, माझ्या हातून जन्मांत कधीं कुणाची हत्या झालेली नाहीं, आणि त्यांत आपल्या पुत्राला मीं मुळीं पाहिलेलाच नाहीं. आपण माझ्यावर अन्याय करीत आहांत.' इतकें बोलून व्यापारी हात जोडून दैत्यापुढें उभा राहिला.

व्यापाऱ्याच्या समर्थनाचा दैत्यावर मुळींच परिणाम

झाला नाहीं. आपले लाल डोळे गरगरा फिरवीत तो गरजला, 'मूर्खा, तूं मजेंत खजूर खाऊन त्याच्या बिया इकडेतिकडे फेंकल्या नाहींस ? त्या बियांतील एकीनें माझ्या लाडक्याचा घात केला. थोडचा वेळापूर्वी स्वच्छंदपणें दुडदुडणारा माझा लाडका बाळ–दुष्टा, तुझ्यामुळें मृत्यूच्या मुखांत पडला आहे.'

पश्चात्तापानें हळहळत व्यापाऱ्यानें दैत्याच्या पायांवर लोटांगण घालून त्याची क्षमा मागितली, परंतु पुत्रवियोगानें व्याकुळ झालेल्या दैत्यानें त्याच्या विनवणीची पर्वा न करतां त्याला पायानें दूर ढकलीत म्हटलें,

'चांडाळा, मोठचा नवसासायासानें झालेल्या पुत्राची अशा प्रकारें हत्त्या झालेली पाहून मी गप्प बसूं होय ? आणि त्याच्या हत्त्येला कारण ठरलेल्या तुझ्यासारख्या दुष्टाला क्षमा करूं होय ? तें शक्य नाहीं. माझ्या पुत्राच्या हत्त्येबद्दल तुला माझ्या या तलवारीनें मृत्युदंड स्वीकारावा लागेलच.'

पुष्कळ समजावूनहि दैत्य मानत नाहीं असें पाहून शेवटीं हताशपणें व्यापारी म्हणाला, 'दैत्यराज, माझ्याकडून अजाणतेपणानें झालेल्या अपराधाबद्दल मला मृत्युदंडाची शिक्षा देऊन आपलें समाधान होत असेल तर मी शिक्षा भोगण्यास तयार आहें. परंतु मृत्यूपूर्वी माझी एक इच्छा आपण पूर्ण कराल तर माझ्यावर आपले मोठे उपकार होतील.'

इतकें बोलून व्यापाऱ्यानें एक महिन्याची मुदत मागून आपल्या घरीं जाऊन येण्याची इच्छा दैत्यापुढें प्रकट केली आणि आपला शब्द पाळण्याचें त्यानें त्याला वचनहि दिलें. व्यापाऱ्याच्या बोलण्याचा दैत्यावर योग्य परिणाम झाला आणि त्यानें त्याला एक महिन्यानें त्याच ठिकाणीं भेटण्यास बजावून सोडलें.

दैत्याकडून एक महिन्यासाठीं का होईना, पण जीवदान मिळाल्यामुळें व्यापारी मोठ्या आनंदांत घरच्या मार्गाला लागला. घरीं येऊन त्यानें घडलेली साद्यंत हकीकत आपल्या आप्तेष्टांना जड मनानें सांगितली. त्याची ती दु:खपूर्ण हकीकत ऐकून त्याच्या कुटुंबियांत आकांत माजला. दिवसांमागून दिवस जात होते. व्यापाऱ्याचा मृत्यु—दिवस जवळ येऊं लागला. त्यानें आपली सर्व स्थावर इस्टेट पत्नी आणि मुलांच्या नांवावर चढविली व जंगम इस्टेट दानधर्म करून टाकली.

शेवटीं दैत्याच्या भेटीस दोन दिवसांचा अवधि ऱ्हातांच त्यानें आपल्या आप्तेष्टांचा भरल्या डोळ्यांनीं निरोप घेऊन घर सोडलें. आणि सतत दोन दिवस प्रवास करून तो ठरलेल्या ठिकाणीं येऊन दैत्याची वाट पाहूं लागला.

बराच वेळ बसल्यानंतर त्याला रस्त्यानें एक वृद्ध मनुष्य आपल्याबरोबर एक हरीण घेऊन जात असलेला दिसला. त्याची आणि त्या वृद्धाची पुढच्याच क्षणीं दृष्टि-

भेट झाली. व्यापाऱ्याला त्या भयानक ठिकाणीं पाहून त्या वृद्धास मोठें आश्चर्य वाटलें आणि तो त्याच्याजवळ आला.

त्याच्याकडे निरखून पहात वृद्धानें त्याला त्या ठिकाणीं येण्याचें कारण विचारलें. व्यापाऱ्यानें वृद्धाकडे केविलवाण्या चेहऱ्यानें पाहिलें. नंतर डोळ्यांत पाणी आणून त्यानें त्या वृद्धापुढें आपली साद्यंत हकीकत निवेदन केली. त्याची ती विचित्र हकीकत ऐकून वृद्धास नवल वाटलें. त्यानें व्यापाऱ्याची समजूत घातली आणि पुढें काय होतें, तें पहाण्यासाठीं तो तेथेंच थांबला.

आणखी थोड्या वेळानें दुसरा एक वृद्ध आपल्या-बरोबर दोन कुत्र्यांना घेऊन त्या वाटेनें चालला होता. व्यापाऱ्याकडे पाहून तोसुद्धां त्याच्याजवळ आला आणि त्यानें त्याला त्या ठिकाणीं येण्याचें कारण विचारलें.

व्यापाऱ्यानें त्या दुसऱ्या वृद्धालाहि आपली कर्मकथा सांगितली. त्याच्यावरील संकट जाणून घेतांच दुसऱ्या वृद्धानें पहिल्या वृद्धाप्रमाणेंच त्याला धीर दिला आणि तोहि पुढें काय होतें तें पहाण्यासाठीं त्या ठिकाणीं थांबला. दुसऱ्या वृद्धाला येऊन थोडा वेळ जातो न जातो तोंच आणखी एक तिसरा वृद्ध आपल्याबरोबर एका घोडीला घेऊन त्या वाटेनें चालला होता. पहिल्या दोन वृद्धांप्रमाणेंच तो तिसरा वृद्धहि व्यापाऱ्याला चिंताग्रस्त बसलेला पाहून त्याच्याजवळ आला आणि त्यानें त्याला त्या ठिकाणीं येण्याचें कारण विचारलें.

व्यापाऱ्याचें दुःख कळतांच त्यानेंहि त्याला धीर दिला आणि तोसुद्धां पुढें काय घडतें तें पहाण्यासाठीं त्या ठिकाणीं थांबला. अशाप्रकारें ते तिन्ही वृद्ध आपआपल्या परीनें व्यापाऱ्याला धीर देऊन त्याचें सांत्वन करूं लागले.

अचानक त्याचवेळीं पुन्हां वादळ सुरू झालें. वाळवंटांतील वाळू आकाशांत वर्तुळाकार फिरूं लागली, आणि पुढच्याच क्षणीं त्यांतून हातांत तलवार घेतलेला दैत्य प्रगट झाला. खदखदून हंसत त्यानें व्यापाऱ्याच्या अंगावर चाल केली आणि त्याला जमिनीवरील वाळूंत लोळवून त्यानें आपला एक पाय त्याच्या छातीवर ठेवला. त्या अचानक हल्ल्यानें व्यापारी थडथड उडूं लागला. त्याला आपला मृत्यु डोळ्यांसमोर दिसूं लागला आणि त्यानें देवाचा धांवा सुरू केला.

त्याची ती दशा पाहून बाजूलाच उभ्या असलेल्या तिन्ही वृद्धांना कळवळून आलें आणि त्यांनीं पुढें होऊन त्याला जीवदान देण्याविषयीं दैत्याची प्रार्थना केली. परंतु त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून सूडानें पेटलेल्या दैत्यानें व्यापाऱ्याला मारण्यासाठीं आपली तलवार उगारली. प्रसंगावधान राखून तिन्ही वृद्धांनीं पुढें होऊन दैत्याचे पाय धरले आणि ते त्याला म्हणाले,

'दैत्यराज, आपण आधीं आपला क्रोध आवरा आणि आम्ही ज्या गोष्टी आपणांस सांगतों त्या लक्षपूर्वक ऐका. आमच्या गोष्टींनीं आपलें मनोरंजन झालें तर

व्यापाऱ्याला मुक्त करून आम्हांला आनंदित करावें.' दैत्याला गोष्टी ऐकण्याचा फार छंद होता. त्या तिन्हीं वृद्धांचें बोलणें ऐकून त्यानें तत्काळ आपली तलवार म्यानांत घातली आणि गोष्टी ऐकण्यासाठीं तो त्या तिन्ही वृद्धांच्या पुढें येऊन बसला.

पहिल्या वृद्धानें सांगितलेली गोष्ट

पहिल्या वृद्धानें जवळच बसलेल्या आपल्या हरिणी-कडे बोट दाखवून म्हटलें, 'दैत्यराज, ही जी हरिणी तुम्हांला दिसते ती हरिणी नसून तिच्या रूपांत माझी पत्नी आहे. माझ्या पत्नीची ही अशी दुर्दशा होण्याचें कारण ऐका.

'माझा जन्म एका वैभवशाली आणि सज्जन घराण्यांत झालेला आहे. माझ्या पित्याचा मी एकुलता एक पुत्र असल्यामुळें त्यांच्या मृत्यूनंतर साऱ्या वैभवाचा वारसा माझ्याकडे आला. लग्नाचें वय होतांच मीं मामाच्या मुलीबरोबर विवाह केला. माझ्या पत्नीचा माझ्यावर फार लोभ होता आणि आम्हीं उभयतां वैभवाचा उपभोग घेत आनंदांत जीवन व्यतीत करीत होतों. मात्र आमच्या त्या सुखी जीवनांत एक दुःख चोरपावलानें प्रवेश करीत असेल याची आम्हां दोघांनाहि कल्पना नव्हती. पण पुढें तें दुःख जेव्हां साकार होऊन आमच्यापुढें उभें राहिलें त्याचवेळीं

आमच्या सुखी वैवाहिक जीवनाची नौका खडकावर आपटून फुटली.

'वर्षांमागून वर्षे जात होतीं. माझें वय वाढीस लागलें, पण....पुत्र-संतान होण्याचीं चिन्हें दिसेनात. शेवटीं पुत्राच्या लालसेनें मीं एका दासीबरोबर विवाह केला. आणि त्याचवेळीं मीं माझ्या सुखी संसाराला सुरुंग लावला. लग्नानंतर दोनच वर्षांनीं दासीपासून मला एक पुत्र प्राप्त झाला आणि मी पुत्रदर्शनानें धन्य झालों. मात्र माझ्या या आनंदांत माझी पहिली पत्नी सहभागी होऊं शकली नाहीं. ती माझ्या दुसऱ्या पत्नीचा म्हणजेच आपल्या सवतीचा द्वेष करूं लागली आणि तिच्या पुत्राकडे पाहून नाक मुरडूं लागली.

'एवढ्यावरच ती थांबली नाहीं तर तिनें त्या दोघांच्या नाशासाठीं अंतस्थ कारस्थानेंहि रचण्यास प्रारंभ केला. अचानक एके दिवशीं कांहीं कामाच्या निमित्तानें माझ्यावर परगांवीं जाण्याचा प्रसंग आला. प्रवासाला जातांना मी आपल्या पत्नीला जवळ घेऊन तिला तिच्या सवतीची आणि माझ्या प्राणप्रिय पुत्राची काळजी घेण्यास बजाविलें.

'मी प्रवासाला निघून जातांच त्या दुष्ट स्त्रीनें आपल्या चेटुक-विद्येनें माझ्या दुसऱ्या पत्नीला आणि पुत्राला अनुक्रमें गाय आणि वासरूं करून तिनें त्यांना एका गुराख्याच्या ताब्यांत देऊन टाकलें. अशाप्रकारें जनावरांच्या रूपांत माझी दुसरी पत्नी आणि पुत्र दिवस कंठूं लागले.

जवळजवळ तीन महिने प्रवास करून मी घरीं आलों. दुसऱ्या पत्नीला आणि पुत्राला घरांत न पाहून मीं ते कुठें आहेत असा पहिल्या पत्नीला प्रश्न विचारला. उत्तरादाखल आधीं ती खूप रडली. नंतर तिनें ते दोघें मरण पावल्याची खबर माझ्या कानीं घातली.

'तिचें कारस्थान माझ्या लक्षांत मुळींच आलें नाहीं आणि मी तिच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून शोक करूं लागलों. त्या अकल्पित दु:खानें मीं चांगलाच खचलों. दिवसांमागून दिवस जाऊं लागले आणि त्याचबरोबर माझें दु:खहि ओसरूं लागलें.

'अशा प्रकारें कांहीं दिवस गेल्यावर आमचा ईद सण आला. त्या सणानिमित्त मीं गाय कापून तिची सागुती वाटण्याचा विचार केला. त्याप्रमाणें गवळ्याला गाय आणण्याचा हुकूम देतांच त्यानें एक धष्टपुष्ट गाय मला आणून दिली. त्या गाईला कापण्यासाठीं मीं सुरा उचलतांच ती जोरानें हंबरूं लागली आणि तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. तें दृश्य पाहून मला त्या गाईची दया आली. परंतु पहिल्या पत्नीनें हट्ट घेतल्यामुळें मला नाइलाजानें इच्छा नसतांनाहि त्याच गाईला कापणें भाग पडलें. परंतु त्या गाईच्या अंगावरून पुरेसें मांस न निघाल्यामुळें मीं गवळ्याकडून एक वासरूं विकत घेतलें.

'त्या वासराला कापण्यासाठीं मीं सुरा उचलतांच

तें वासरूंहि गाईप्रमाणेंच करुणपणें हंबरूं लागलें आणि त्याच्याहि डोळ्यांतून अश्रूधारा वाहूं लागल्या. तें वासरूं माझ्या पायांजवळ बसतांच माझें हृदय कळवळलें आणि मीं त्या वासराला सोडुन देऊन दुसऱ्या वासरावर ईद साजरी केली. मीं पहिल्या वासराला न कापतां दुसऱ्या वासराला कापल्यामुळें माझी पत्नी माझ्यावर रुष्ट झाली. तिच्या रुष्टतेचें कारण न कळल्यामुळें मीसुद्धां त्याकडे दुर्लक्ष केलें. पण एके दिवशीं तिनें माझ्या नकळत तें वासरूं

एका कसायाला विकून टाकलें.

'ज्या कसायाला माझ्या पत्नीनें वासरूं विकलें होतें त्या कसायाला एक मुलगी होती आणि ती जादूविद्येंत पारंगत होती. एकदां कसाई त्या वासराला कापण्याच्या तयारींत असतांनाच त्याची ती मुलगी त्या ठिकाणीं आली. तिनें आपल्या जादूविद्येनें जाणलें कीं, आपला बाप एका वासराला कापीत नसून त्याच्या रूपांत असलेल्या आपल्याच शहरांतील व्यापाऱ्याच्या मुलाला कापीत आहे.

'त्या धीट मुलीनें ताबडतोब आपल्या बापाला सत्य प्रकार सांगून त्याच्या हातून होणाऱ्या अनर्थाला प्रतिबंध केला, आणि त्याचबरोबर माझ्याकडे निरोप पाठवून तिनें मला आपला पुत्र घेऊन जाण्यास सांगितलें.

'पुत्र जिवंत असल्याचा निरोप मिळतांच मी आनंदानें पळतच कसायाच्या घरीं गेलों. पण त्या ठिकाणीं जातांच एका वासराकडे बोट दाखवून कसायाच्या मुलीनें तें वासरूं म्हणजे माझा मुलगा असल्याचें सांगितलें. मला त्या कसायाच्या मुलीच्या बोलण्याचा अर्थ न कळल्यामुळें मी आळीपाळीनें तिच्याकडे आणि वासराकडे पाहूं लागलों.

'मी बुचकळ्यांत पडलों असें पाहून ती मुलगी पुढें म्हणाली, 'माझ्यावर विश्वास ठेवा. मी खरें तेंच सांगत आहें. या वासराच्या रूपांत तुमचा मुलगा आहे आणि त्याची अशी दशा व्हायला तुमची पहिली पत्नीच कारण झालेली आहे. त्या दुष्ट स्त्रीनेंच या मुलाला आपल्या

चेटुकविद्येनें वासरूं बनविलें आणि त्याच्या आईला गाय बनविली.

'पण दुर्दैव असें कीं, ती स्त्री आज जगांत नाहीं. गाईच्या रूपांत असलेल्या आपल्या पत्नीच्याच गळ्यावर आपण सुरी फिरवली. या वासराच्या रूपांत असलेल्या आपल्या मुलाचीहि आपण त्या दिवशीं हत्त्या केली असती, परंतु मुलाचें आयुष्य बळकट म्हणून ऐनवेळीं त्याची तुम्हांला दया आली आणि त्याला जीवदान मिळालें. परंतु तुमच्या नकळत त्या चांडाळणीनें हें वासरूं माझ्या पित्याला विकलें. आज माझ्या पित्याकडूनहि आपल्या पुत्राची हत्त्या होणार होती. परंतु वेळींच मी आल्यामुळें अनर्थ टळला.'

'कसायाच्या मुलीनें माझे डोळे उघडले आणि मला सत्य गोष्टीची जाणीव करून दिली. माझ्या पहिल्या पत्नीचीं दुष्ट कारस्थानें कळतांच मी तिच्या सूडासाठीं उपाय शोधूं लागलों. माझ्या संसाराची धूळधाण करणाऱ्या त्या चेटकिणीचा नाश कसा करतां येईल याचाच मला ध्यास लागला. शेवटीं मला एक युक्ति सुचली आणि मीं त्या कसायाच्या मुलीला अवगत असलेल्या जादूविद्येचा त्या चांडाळणीवर प्रयोग करण्याचा निश्चय केला.

'त्या मुलीनें मंत्र उच्चारून वासरावर पाणी शिपडतांच तें वासरूं अदृश्य झालें आणि त्याच्या जागीं एक छान मुलगा दिसूं लागला. आपल्या पुत्राला पाहून माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले आणि पुढें होऊन

मीं त्याला उचलून घट्ट हृदयाशीं धरलें. नंतर त्या कसायाच्या मुलीला बरोबर घेऊन मी घरीं आलों.

'पुत्रासह मला पाहून माझी पहिली पत्नी प्रथम डळमळली. नंतर संतापून तिनें माझ्या पुत्रावर पुन्हां जादूचा प्रयोग करण्यासाठीं मंत्र उच्चारण्यास प्रारंभ केला. परंतु सुदैवानें आमच्याजवळ कसायाची मुलगी होती. प्रसंगावधान राखून तिनें माझ्या सूचनेची वाट न पहातां मंत्र उच्चार करून थोडें पाणी माझ्या पहिल्या पत्नीच्या अंगावर शिपडलें.

'कसायाच्या मुलीनें शिपडलेल्या पाण्याचा तत्काळ योग्य तो परिणाम झाला. आणि माझी पत्नी मनुष्यदेह सोडून या हरिणीच्या रूपानें वावरूं लागली. कसायाच्या मुलीचे उपकार स्मरून मीं तिला आपली सून करून घेतली.

आज माझा पुत्र आपल्या पत्नी–मुलांसह मोठ्या सुखांत माझ्या ऐश्वर्याचा उपभोग घेत आहे आणि मी या शाप-भ्रष्ट पत्नीला हरिणीच्या रूपांत घेऊन तीर्थयात्रा करीत आहें.'

दुसऱ्या वृद्धानें सांगितलेली गोष्ट

पहिल्या वृद्धाची गोष्ट ऐकून दैत्याचें समाधान झालें आणि तो दुसऱ्या वृद्धाची गोष्ट ऐकण्यासाठीं अधीर झाला. त्याची ती उत्सुकता पाहून दुसऱ्या वृद्धानें आपल्या-बरोबर असलेल्या दोन्हीं कुत्र्यांकडे निर्देश करून म्हटलें,

'दैत्यराज, ह्या दोन्हीं कुत्र्यांच्या रूपांत माझे दोन सख्खे भाऊ आहेत त्यांची अशी ही दशा कशामुळें झाली तें श्रवण करावें.

'आई–बापाच्या मृत्यूनंतर आम्ही तिघे भाऊ पोरके झालों. आम्हांला मायेच्या पंखाखालीं घेऊन प्रेमाची ऊब देणारा एकहिजण आमच्या कुटुंबांत उरला नाहीं. घरांत जबाबदार व्यक्ति नसल्यामुळें आम्हां भावांचें जीवन स्वैरपूर्ण होऊं लागलें. योग्य शिक्षणाअभावीं आणि बंधना-अभावीं माझे दोघे मोठे भाऊ दुर्वर्तनी आणि व्यसनी बनले. त्यांनीं व्यसनापायीं आपल्या वडिलोपार्जित इस्टेटीची

धूळधाण केली. शेवटीं घराचें दार बंद करून एके दिवशीं त्या दोघांनीं पलायन केलें.

'मला एकट्याला सोडून जातांना त्यांना माझी दया आली नाहीं. मी मात्र त्यांच्या मागें दु:खी होऊन त्यांना शोधण्यासाठीं गांवोगांव पर्यटन करूं लागलों. दिवसभर त्यांना शोधीत हिंडायचें आणि रात्रीं कुठें तरी मिळेल तें खाऊन झोंपीं जायचें, असा माझा रोजचाच कार्यक्रम ठरून गेला होता.

'गांवांमागून गांवें आणि शहरांमागून शहरें धुंडाळीत मी चाललों होतों, परंतु माझ्या भावांचा कांहीं केल्या मला शोध लागेना. एके दिवशीं हिंडतां–हिंडतां मी बगदाद शहरांत येऊन पोहोंचलों. पुष्कळ दिवस पोटांत अन्न नसल्यामुळें आणि प्रवासाच्या परिश्रमानें माझी शारीरिक स्थिति खालावली होती. बगदाद शहरांत येतांच मीं आपल्याजवळ असलेला सोन्याचा ताईत विकला आणि त्याचे आलेले वीस रुपये घेऊन मीं खजुराचा धंदा सुरू केला. खजूर खरेदी करण्यासाठीं माझ्यावर वारंवार बगदाद शहराच्या आसपास असलेल्या खेड्यांत जाण्याचा प्रसंग येऊं लागला.

'एकदां खजूर खरेदी करण्यासाठीं मी शहराजवळच असलेल्या खेड्यांत चाललों होतों. मी ज्या वाटेवरून चाललों होतों ती वाट एका स्मशानांतून जात होती. मी त्या स्मशानाजवळ येतांच एक चमत्कारिक दृश्य पाहून

एका झाडामागें लपलों. मी ज्या झाडामागें लपलों होतों तेथून पन्नास फुटांवरच असलेल्या त्या स्मशानांत एक माणूस आपल्या दोन्हीं हातांनीं थडगें उकरीत होता. मी झाडाआडूनच पुढें काय होतें तें पाहूं लागलों.

'थोड्या वेळानें त्या अनोळखी माणसानें थडग्यांतून एक प्रेत बाहेर काढलें आणि त्याच्या छातीवर बसून तो त्याला निर्दयपणें मारूं लागला. तें अघटित दृश्य पाहून मला स्वस्थ रहावेना. म्हणून मी त्या माणसाजवळ गेलों आणि त्याच्या वागण्याचा अर्थ त्याला विचारला. परंतु माझ्या प्रश्नाचें उत्तर न देतां तो त्या प्रेतावर अधिकच तुटून पडला. मला त्याची वर्तणूक असह्य झाली आणि मीं जरा खडसावूनच त्याला पुन्हां तोच प्रश्न विचारला. मी

संतापलों आहें, असें पाहून तो म्हणाला,

'तूं कोण मला विचारणारा ! तुला जर त्याची इतकी दया येते तर त्यानें मरणापूर्वी माझ्याकडून घेतलेलें कर्ज तूं देऊन टाक.' त्याचें वाक्य पुरें होण्यापूर्वींच मीं त्याला कर्जाची रक्कम किती आहे असा प्रश्न केला. त्यानें केवळ वीस रुपये कर्ज असल्याचें सांगतांच मला तशाहि स्थितींत हंसूं आलें आणि मीं जवळचे वीस रुपये काढून त्याला दिले.

'पैसे मिळतांच मोठ्या आनंदांत त्यानें मला नमस्कार केला आणि तो आपल्या मार्गाला लागला. तो निघून गेल्यावर मीं तें प्रेत पूर्ववत् थडग्यांत ठेवून त्यावर माती ढकलली. प्रेताची व्यवस्था करून मी मागल्या पावलीं बगदाद शहरांत परतलों. जवळची सारी पुंजी त्या माणसाला देऊन टाकल्यामुळें मी कफल्लक झालों होतों. एक वेळच्या जेवणापुरतेहि पैसे माझ्या खिशांत शिल्लक राहिले नव्हते. पुढें काय करावें याच विचारांत मी घोटाळूं लागलों. शेवटीं बराच विचार करून मीं नोकरी करण्याचा विचार केला. साऱ्या बगदाद शहरांत हिंडूनहि नोकरी न मिळाल्यामुळें मीं तें शहर सोडलें आणि नोकरीच्या शोधार्थ गांवोंगांवीं फिरूं लागलों.

फिरतां–फिरतां मीं एका गांवीं आलों. त्या दिवशीं मीं त्या गांवींच मुक्काम करण्याचा विचार केला. गांवांत कुठेंच आश्रय न मिळाल्यामुळें मीं गांवाबाहेर येऊन झाडा-

खालीं मुक्काम केला. प्रवासाच्या दगदगीनें सारें अंग दुखत होतें. थोडा वेळ झाडाखालीं विसांवतांच मी झोंपीं गेलों. अचानक कसल्याशा गलबल्यानें मी जागा झालों. ती रात्रीची वेळ होती आणि मी ज्या झाडाखालीं झोंपलों होतों त्यापासून थोड्या अंतरावर झगझगीत प्रकाशांत पुष्कळशीं माणसें हंसत-खिदळत गप्पागोष्टी करीत होतीं.

'तो एकादा जलसा असावा असा विचार करून मी त्या झाडाखालूनच मौज पाहूं लागलों. जलशासाठीं उपस्थित असलेलीं सर्व माणसें आपआपल्या योग्यतेनुसार जाजमावर, गालिचावर, खुर्च्यांवर बसलेलीं होतीं त्या सर्वांच्या मध्यभागीं उंचावर एक सिंहासन मांडलेलें होतें, आणि त्यावर एक तेजस्वी पुरुष बसला होता. त्याच्यापुढें मोकळ्या-वर्तुळाकार असलेल्या जागीं बऱ्याच सुंदर स्त्रिया नाचण्याच्या पवित्र्यांत हात जोडून उभ्या होत्या. बाजूलाच वाद्यें वाजविणारीं कलावंत मंडळी सुरांची जुळवाजुळव करीत बसली होती. कलावंत सुसज्ज होतांच समारंभाच्या मध्यभागीं स्थानापन्न झालेल्या त्या तेजस्वी पुरुषानें टाळी वाजवून नृत्यारंभ करण्यास संकेत केला.

'हळूहळू नृत्याची रंगत वाढूं लागली. पुढें पुढें तर प्रेक्षक देहभान विसरून नृत्यांत मग्न झाले. नृत्य अगदीं रंगांत आलें होतें तोंच तबलजीची थाप सैल पडून त्यानें मध्येंच तबला वाजविणें बंद केलें. तबला थांबतांच नृत्याचा रंग उतरला आणि सर्व प्रेक्षक तबलजीकडे संतापानें पाहूं लागले. अशा प्रकारें रंगाचा बेरंग झालेला पाहून सिंहा-

सनावर स्थानापन्न झालेल्या तेजस्वी पुरुषानें तबलजीकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून त्याला तबला थांबविण्याचें कारण विचारलें.

'सर्व प्रेक्षकांच्या रोषाला कारण ठरल्यामुळें बिचारा तबलजी थरथरत म्हणाला, 'मला क्षमा करा, आपल्या मनोरंजनांत व्यत्यय आणल्यामुळें मी आपला अपराधी आहें. अचानक मला माझ्या कर्तव्याची जाणीव झाल्यामुळें माझ्या हातून हा अपराध घडला. तबला वाजवीत असतांना समोर नृत्य करीत असणाऱ्या एका नर्तकीच्या हातावर कोडाचा डाग पाहून मला माझ्या देशांतील राजाची आठवण झाली.

'अलीकडीलच कांहीं वर्षांत त्यांच्या अंगावर कोडाचे चट्टे उठले आहेत आणि त्यांना लज्जेनें प्रजेपुढें तोंड काढणेंहि कठीण झालें आहे. त्या कोडावर त्यांनीं पुष्कळ उपचार केले, परंतु तें कांहीं केल्या हटत नाहीं. शेवटीं कंटाळून त्यांनीं आत्मघाताचा विचार केला. मी त्यांचा आवडता कलावंत असल्यामुळें त्यांनीं आपला आत्मघाताचा विचार माझ्या कानीं घातला. महाराजांचा तो निर्णय ऐकून मला फार वाईट वाटलें आणि मीं त्यांना धीर देऊन सहकार्य देण्याचें वचन दिलें. प्रथम त्यांनीं माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलें. पण मीं पुष्कळ विनवणी केल्यामुळें त्यांनीं मला एक महिन्याची मुदत दिली. एक महिन्यांत मी त्यांचा रोग दूर करूं शकलों नाहीं तर ठरल्याप्रमाणें ते आत्मघात करून घेणार होते.

'माझ्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं त्यांच्या रोगावर उपचार करणाऱ्यास एक लाख रुपयांचें बक्षीसहि जाहीर केलें. इकड महिन्याची मुदत घेऊन मी कोडावर औषध शोधूं लागलों. राज्यांतील सर्व वैद्यांना भेटून मी त्यांच्याकडून कोडावरील औषध मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या कामीं मला यश आलें नाहीं. वैद्यांच्या शोधांत असतांनाच एके दिवशीं मला एक संन्यासी भेटला. माझा चिंताग्रस्त चेहरा पाहून त्या चतुर संन्याशानें माझ्या चिंतेचें कारण विचारलें. मीं आपलें दुःख त्याच्यापुढें निवेदन करतांच त्यानें मला धीर देऊन कोडावरील औषध सांगितलें.

'पांढऱ्या झाडाचीं काळीं पानें वाटून त्यांचा लेप केल्यानें कोड बरें होतें' असें तो मला म्हणाला. पण तें झाड कुठें आहे हें कांहीं त्यानें मला सांगितलें नाहीं. मी मात्र त्या पांढऱ्या झाडाच्या काळ्या पानांचा शोध करीत या ठिकाणापर्यंत येऊन पोहोंचलों आहें. अजून मला त्या झाडाचा शोध लागलेला नाहीं. मीं राजाकडून घेतलेली एक महिन्याची मुदत संपत आलेली आहे, केवळ तीन दिवसांचाच काय तो अवधि आहे. ह्या तीन दिवसांत कोडावर औषध मिळालें नाहीं तर राजा ठरल्याप्रमाणें आत्मघात केल्याशिवाय राहाणार नाहीं. थोड्या वेळापूर्वीं एका नर्तकीच्या अंगावरील कोडाचा डाग पाहून मला माझ्या कर्तव्याची जाणीव झाली आणि तबल्यावरची माझी थाप सैल पडली.'

'इतकें बोलून तबलजी खालीं मान घालून उभा

राहिला. त्याची कथा ऐकून प्रेक्षकांना मोठाच अचंबा वाटला. आणि त्या सर्वांनीं हळहळ व्यक्त केली. तबलजीच्या दुःखांत सहभागी होऊन सर्वांनीं पुढील कार्यक्रम स्थगित केला.

'दैत्यराज, झाडाखालीं बसूनच मी समोर घडत असलेला प्रकार पहात होतों. जलसा संपल्याची घोषणा होतांच सारे प्रेक्षक आपआपल्या घरीं निघून गेले. थोड्या वेळापूर्वीं सुशोभित असलेलें तें ठिकाण कार्यक्रम संपतांच स्मशानासारखें भासूं लागलें. मी त्या तबलजीच्या विचित्र गोष्टीचा विचार करीत झाडाखालींच झोंपीं गेलों.

'दुसऱ्या दिवशीं पहांटेंच मला जाग आली आणि मीं डोळे उघडले. माझा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. मी ज्या झाडाखालीं मुक्काम केला होता तें झाड पांढऱ्या रंगाचें होतें आणि त्याचीं पानें काळीं होतीं.

'मी लगबगीनें उठलों आणि झाडाचीं पानें तोडलीं. नंतर तीं पानें घेऊन मी तबलजीच्या मदतीनें त्याच्या राज्यांत गेलों. संन्याशाच्या सांगण्याप्रमाणें मीं त्या काळ्या पानांचा लेप राजाच्या अंगाला केला आणि काय आश्चर्य, दुसऱ्याच दिवशीं राजा रोगांतून मुक्त झाला. जाहीर केल्याप्रमाणें मला एक लक्ष रुपये बक्षीस देऊन राजानें माझा गौरव केला. दोन चार दिवस पाहुणचार घेतल्यानंतर मी राजाचा निरोप घेऊन आपल्या गांवीं आलों, आणि बक्षीस म्हणून मिळालेले एक लक्ष रुपये धंद्यांत गुंतविले.

'सुदैवानें माझा धंदा तेजींत आला आणि मी थोड्याच दिवसांत नगरशेठ म्हणून नांवलौकिकास चढलों. पुढें पुढें माझ्याजवळ इतकें धन सांठलें, कीं मी दानधर्म करूं लागलों. थोड्याच दिवसांत दानशूर म्हणून माझें नांव सर्वत्र पसरलें. सर्व संस्थांना आणि दीन–दुबळ्यांना माझ्या संपत्तीचा उपयोग होऊं लागला. एके दिवशीं एक याचक माझ्याजवळ येऊन संपत्तीची याचना करूं लागला. मीं त्या याचकाचें निरीक्षण केल्यावर मला कळून आलें कीं तो माझा भाऊ आहे.

'अत्यानंदानें मीं माझ्या मोठ्या भावाला हृदयाशीं धरलें आणि त्याला पुष्कळ धन देऊन धंद्यास लावलें. दिवसांमागून दिवस चालले होते एके दिवशीं माझा दुसरा मोठा भाऊहि माझ्याजवळ आला. त्याची परिस्थिति पाहून मला फार वाईट वाटलें. त्यालाहि पुष्कळ धन देऊन मीं धंद्याला लावलें.

'माझ्या दोन्हीं भावांना धंद्याला लावून मी धन्य झालों. पण माझें सुख फार दिवस टिकलें नाहीं. माझी संपत्ति–ऐश्वर्य आणि कीर्ति माझ्या भावांच्या डोळ्यांत येऊं लागली. आणि दोघांनीं माझ्याविरुद्ध कारस्थानें सुरू केलीं. एके दिवशीं त्यांनीं माझ्यावर हल्ला करून मला एका विहिरींत लोटून दिलें आणि माझी सारी संपत्ति लुटली. माझ्या आयुष्याची दोरी बळकट होती म्हणूनच तशाहि अवस्थेंत एका जादूगारानें मला वांचविलें आणि तो मला आपल्या घरीं घेऊन गेला.

'माझी प्रकृति सुधारतांच जादूगारानें माझी ओळख विचारली. मीं आपली साद्यंत हकीकत त्याला सांगून आपल्या घातकी भावांना अद्दल घडविण्याची विनंति केली. माझी कथा ऐकून त्या जादूगाराचें मन द्रवलें आणि त्यानें आपल्या जादूच्या विद्येनें माझ्या दोन्ही भावांची ही अशी दशा करून टाकली. संपत्तीच्या लोभामुळेंच माझ्या दोन्हीं भावांना शापभ्रष्ट व्हावें लागलें. त्यांची ती दशा पाहून मला वाईट वाटलें आणि मी माझी सर्व संपत्ति दान करून त्यांना घेऊन तीर्थयात्रा करीत फिरूं लागलों.'

दोन्ही वृद्धांनीं सांगितलेल्या गोष्टी दैत्यानें तन्मयतेनें ऐकून घेतल्या. त्या गोष्टी ऐकून त्याचें चांगलेंच मनोरंजन झालें आणि त्याचा चेहरा प्रसन्न दिसूं लागला. तो

गोष्टी ऐकण्यांत रंगून गेला आहे असें पाहून तिसऱ्या वृद्धानें मोठ्या उत्साहानें आपली गोष्ट सांगण्यास सुरुवात केली.

तिसऱ्या वृद्धानें सांगितलेली गोष्ट

तो म्हणाला, 'दैत्यराज, माझ्याजवळ ही जी घोडी आहे ती वास्तविक पहातां घोडी नसून तिच्या रूपांत माझी पत्नी आहे. माझ्या दुर्दैवी पत्नीची अशी दशा कशामुळें झाली आहे तें श्रवण करा.

'मी एक दुर्दैवी माणूस आहें. माझा जन्म एका गरीब कुटुंबांत झालेला आहे. माझ्या जन्माबरोबरच माझी आई मृत्युमुखीं पडली आणि त्यानंतर कांहीं दिवसांनीं माझ्या आईच्या ध्यासानें माझे वडील वारले.

'अशाप्रकारें बालवयांतच माता-पित्यांच्या प्रेमाला पारखा होऊन मी जगांत उघड्यावर पडलों. आमच्या शेजारींच एक कोळ्याचें घर होतें. बरींच वर्षें त्या घरांत मूलबाळ नसल्यामुळें तीं कोळी पति-पत्नी मनोमन दुःखी होतीं. माझी ती दुर्दशा पाहून त्या दोघांनाहि माझी करुणा आली आणि त्यांनीं मला सांभाळलें.

'त्या कोळी कुटुंबांत माझ्या आगमनामुळें आनंद आणि उत्साह संचारला. मोठ्या लाडांत माझें कांहीं दिवस पालन झालें, पण पुढें कोळ्याला पुत्र झाल्यामुळें माझी उपेक्षा होऊं लागली. दिवसांमागून दिवस जाऊं लागले

आणि त्याचबरोबर कोळणीकडून मला सावत्रपणाची झळ लागूं लागली. आपल्या स्वतःच्या पुत्राचें पालन करण्यांत कोळी दांपत्य इतकें रंगूं लागलें कीं, मी म्हणजे त्यांना अडगळ वाटूं लागलों. एखाद्या कुचकामी प्राण्याकडे पहावें तशा दृष्टीनें तीं माझ्याकडे पाहूं लागलीं.

अशाप्रकारें नाना तऱ्हेच्या हालअपेष्टा भोगून मीं बालवयांतून तारुण्यांत प्रवेश केला. दिवसभर कोळ्याकडे पडेल तें काम करून मिळेल तें शिळे–पाकें अन्न खाऊन मी जगत होतों. एके दिवशीं कोळणीनें मला जंगलांतून लांकडें आणण्यास सांगितलें. तिची आज्ञा होतांच कुऱ्हाड घेऊन मीं जंगलाची वाट धरली आणि जंगलांत येऊन लांकडें शोधूं लागलों.

' एक चांगलें जाडजूड झाड पाहून मीं त्यावर घाव घालण्यासाठीं कुऱ्हाड उचलली तोंच त्या झाडाआडून एक स्वरूपसुंदर तरुणी निघून माझ्यापुढें उभी राहिली. त्या लावण्यवतीकडे पाहून झाडावर घाव घालण्यासाठीं उगारलेली माझी कुऱ्हाड मागच्या मागें हातांतून गळून पडली आणि मी डोळे फाडून त्या तरुणीच्या लावण्याकडे पाहूं लागलों.

' माझें तें वर्तन पाहून ती तरुणी संकोचली आणि पुन्हां झाडाआड जाऊन लपली. ती तरुणी कोण आहे आणि कुठें रहाते याचा विचार न करतां तिच्यावर मोहित होऊन मी पुढें झालों आणि तिचा हात धरला. मीं त्या

तरुणीचा हात पकडतांच ती भांबावली आणि माझा हात झटकून तिनें तेथून पळ काढला.

' मीं तिचा पुष्कळ शोध केला, पण ती हातीं लागली नाहीं. मी अस्वस्थ मनानें लांकडें घेऊन घरीं आलों. त्यानंतर मी रोज जंगलांतील त्या ठिकाणीं जाऊं लागलों आणि रोज तिची–माझी भेट होऊं लागली. आमचा परिचय दिवसेंदिवस वाढूं लागला आणि त्याचबरोबर आम्ही एकमेकांवर प्रेम करूं लागलों.

' थोड्याच दिवसांनीं आम्हीं विवाह केला. विवाहानंतर मीं कोळ्याचें घर सोडलें आणि माझ्या पत्नीच्या घरीं राहूं लागलों. आम्हां उभयतांचे दिवस मोठ्या आनंदांत चालले. त्या आनंदाचा कळस म्हणजे लौकरच माझ्या पत्नीनें एका सुंदर मुलाला जन्म दिला. पण आमचें हें सुखी जीवन दैवाला रुचलें नाहीं. ज्याची कधीं स्वप्नांतहि

कल्पना केली नव्हती असें दुःख माझ्यापुढें पसरलें. त्या अकल्पित संकटानें मी पुरता हादरलों.

'एके दिवशीं माझ्या पत्नीच्या तोंडून ती राक्षस-कन्या असल्याचें कळून येतांच मी तिच्यावर संतापलों आणि विश्वासघात करून मला फसविल्याबद्दल तिची हत्त्या करण्यासाठीं मी कुऱ्हाड उचलली, परंतु माझ्यापुढें दयेची याचना करून तिनें 'जें कांहीं केलें तें आपल्या प्रेमासाठींच केलें' असें सांगितल्यामुळें मला तिची अनु-कंपा वाटली आणि मीं तिला जीवदान दिलें. पत्नीची एका वर्षांतील आपुलकी आणि माझ्याबद्दल तिला वाटणारा जिव्हाळा आठवून मीं तिला क्षमा केली आणि मनाची समजूत घालून मी पुन्हां संसारांत रमून गेलों.

'हळूहळू मला साऱ्या रहस्याचा उलगडा होऊं लागला. माझ्या पत्नीला एक भाऊ होता आणि त्याच्या अनुपस्थितींत तिनें माझ्याशीं प्रेमविवाह केला होता. जेव्हां तिच्या तोंडून तिच्या भावाच्या एकेक क्रूरपणाच्या गोष्टी माझ्या कानीं आल्या तेव्हां माझें काळीज थरारलें आणि मी भावी संकटाशीं कसा सामना द्यावा या विचारांत रात्रंदिवस तळमळूं लागलों. माझ्या पत्नीला आपला भाऊ म्हणजे साक्षात् कर्दनकाळच वाटे. त्याच्या संमती-शिवाय विवाह केल्यामुळें ती आधींच मनोमन झुरत होती. त्यांत माझा धीर सुटलेला पाहून तिच्या तोंडचें पाणीच पळालें.

'अशा मनोविदारक स्थितींत आम्हां उभयतांचे

दिवस चालले होते. थोडयाच दिवसांत एका वर्षासाठीं बाहेर गेलेला दैत्य काम संपवून घरीं परतला. घरांतून आपली बहीण अदृश्य झाल्याचें त्याला आपल्या पत्नीकडून कळतांच तो अतिशय दुःखी झाला आणि त्यानें तिचा शोध सुरू केला. पुष्कळ शोध केल्यानंतर त्याला आपल्या एका विश्वासू सेवकाकडून बहिणीचा पत्ता कळला. त्या सेवकानें त्याला आमच्या संसाराचें वर्णनहि ऐकविलें. आपल्या प्राणप्रिय बहिणीनें परवानगीशिवाय घरांतून बाहेर पडून एका मानवाशीं लग्न करावें ही गोष्ट कांहीं त्या दैत्याला आवडली नाहीं. आपल्या बहिणीनें आपला उपमर्द करून कुळाचें नांव बुडविलें असें गृहीत धरून तो सेवकांना बरोबर घेऊन माझ्या घरापुढें येऊन उभा राहिला.

'त्यावेळीं मी घरांत नव्हतों. माझ्या पत्नीला त्यानें

घराबाहेर काढून मारहाण करण्यास प्रारंभ केला. तिच्या करुण किंकाळ्यांनीं जवळपासचा सारा भाग निनादूं लागला. पण त्याकडे दुर्लक्ष करून तो दैत्य निर्दयपणें आपल्या बहिणीला (माझ्या पत्नीला) मारीतच होता. संतापानें बेहोष झालेल्या दैत्याची नशा उतरतांच त्यानें माझ्या पत्नीला आपल्याबरोबर घरीं चलण्याची आज्ञा केली. परंतु तिनें माझ्या परवानगीवांचून येण्यास नकार दिला.

'आपली बहीण आपल्यापेक्षां एका क्षुल्लक मानवाला अधिक महत्व देत आहे असें पाहून तो दैत्य अधिकच खवळला, आणि माझा घात करण्यासाठीं घरांत शिरला. परंतु मला त्या ठिकाणीं गैरहजर पाहून त्यानें माझ्या मुलाला उचललें आणि त्याला घेऊन तो जाऊं लागला.

'आपल्या मुलाला अशाप्रकारें भावाला घेऊन जातांना पाहून माझी पत्नी त्याला विरोध करूं लागली. परंतु त्या दुष्ट दैत्यानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें तिला घोडी बनविली आणि मुलाला घेऊन तो घरीं गेला. त्या दैत्याला मूल–बाळ नसल्यामुळें त्यानें मोठ्या आवडीनें माझ्या मुलालाच आपला मुलगा मानला आणि तो त्याचें पालन-पोषण करूं लागला.

'इकडे मी बाहेरून घरीं आलों, परंतु घरांत पत्नीला आणि मुलाला न पाहून माझा जीव कासावीस होऊं लागला.

कुठेंतरी बाहेर गेली असेल अशी मनाची समजूत करून घेऊन मी पत्नीची वाट पाहूं लागलों. अर्धाअधिक दिवस निघून गेला तरी पत्नी घरीं न आलेली पाहून मी तिच्या शोधासाठीं बाहेर निघालों. घरापासून शंभर पावलें जातों न जातों तोंच एक घोडी माझ्या दृष्टीला पडली. मी त्या घोडीजवळून जाऊं लागतांच ती मनुष्यवाणीनें बोलतांना पाहून मी तिच्याजवळ गेलों आणि तिचें बोलणें ऐकूं लागलों. घोडीनें डोळ्यांत पाणी आणून म्हटलें,

'नाथ ! तुम्ही कुठें चालला आहांत ? थोड्या वेळापूर्वींच माझा भाऊ आपल्या घरीं आला होता आणि त्यानेंच आपल्या बाळाला माझ्याकडून हिरावून घेतलें. मी बाळाला त्याच्या हातून सोडविण्याचा जेव्हां प्रयत्न करूं लागलें तेव्हां त्यानें आपल्या मंत्रविद्येनें मला जखडून टाकलें. आपलें आयुष्य बळकट म्हणून आपण वांचलां, नाहींतर त्या दुष्टानें आपल्याला पहातांच ठार केलें असतें. निदान आतांतरी त्याच्याकडे जाऊं नका. माझें ऐका आणि माझ्याबरोबर घरीं चला. आपल्या बाळाची चिंता घेणारा एक परमेश्वरच आहे.'

'पत्नीचें तें दुःखपूर्ण बोलणें ऐकून आणि तिची ती दशा पाहून माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. दुःखाचा आवेग ओसरतांच पत्नीला घेऊन मी घरीं आलों आणि दुसऱ्याच दिवशीं दैत्याच्या दहशतीनें मीं आपला मुक्काम हलविला आणि घोडीच्या रूपांत असलेल्या माझ्या पतिनिष्ठ आणि प्रेमळ पत्नीला घेऊन तीर्थयात्रा करूं लागलों...'

तिसऱ्या वृद्धानें आपली गोष्ट संपविली आणि तो हात जोडून दैत्याला म्हणाला, 'दैत्यराज, आमच्या तिन्ही गोष्टी आपण तन्मयतेनें ऐकल्या त्याबद्दल आम्ही आपलें अभिनंदन करतों आणि त्या गोष्टी आपणांस आवडल्याहि असणार याची आम्हांला खात्री आहे. विशेषतः मीं सांगितलेली गोष्ट आपल्याला अधिक पसंत पडली असेल. कारण मीं सांगितलेल्या गोष्टीशीं आपला संबंध आहे.

'दैत्यराज, व्यापाऱ्यानें अजाणतेपणीं फेंकलेल्या खजुराच्या बियांपैकीं एक बीं आपल्या पुत्राच्या घशांत अडकून त्याच्यावर ओढवलेल्या मृत्यूमुळें आपण पुत्रशोकानें व्याकुळ होऊन आपल्या दुःखाला कारण ठरलेल्या व्यापाऱ्याला मृत्युदंड देण्यास निघाला, पण स्पष्ट बोलतों त्याबद्दल क्षमा असावी ज्या पुत्रासाठीं आपण व्यापाऱ्याला मृत्युदंड देण्यास तयार झाला तो पुत्र आपला नसून माझा होता. त्या निष्पाप जीवाच्या हत्त्येबद्दल खरें दुःख मला व्हायला पाहिजे, कारण मी त्याचा पिता आहें. मला आणि माझ्या पत्नीला पुत्रशोकाचें दु:ख भोगण्यास लावणारा माणूस दुसरा तिसरा कोणी नसून आपणच आहांत आणि आपणच माझ्या पत्नीला म्हणजेच आपल्या बहिणीला घोडी बनवून तिच्या पुत्राला तिच्यापासून हिरावून घेतलें.

'दैत्यराज, माझ्या पत्नीला घोडीच्या रूपांत बदलून आणि माझ्या पुत्राला हिरावून घेऊन आपणच माझ्या सुखी संसाराची धूळधाण केली आहे. इतकें करूनहि आपलें समाधान झालें नसेल तर त्या तलवारीनें व्यापाऱ्याचा

शिरच्छेद करण्यापेक्षां माझा शिरच्छेद करून मला मुक्ति द्या.'

तिसऱ्या वृद्धाची ती विचित्र हकीकत ऐकून बाकीचे दोन वृद्ध आणि व्यापारी थरथरां कांपूं लागले. आतां कांहीं तिसरा वृद्ध दैत्याच्या हातून जगत नाहीं याची त्या सर्वांना खात्री पटली आणि ते दैत्यराज काय करतो त्याकडे डोळे फाडून पाहूं लागले.

पण त्यांना जसें वाटलें होतें तसें कांहींहि घडलें नाहीं. जें घडलें त्याकडे पाहून त्या सर्वांनीं तोंडांत बोटें घातलीं. तिसऱ्या वृद्धाचें बोलणें दैत्यानें शांतपणें ऐकून घेतलें आणि त्यानें पश्चात्तापानें आणि लज्जेनें मान खालीं घातली. तिसऱ्या वृद्धाला अधिक बोलूं न देतां तो पुढें झाला आणि त्यानें त्याचे पाय धरून क्षमा मागितली.

उदार हृदयानें वृद्धानेंहि त्याला क्षमा केली. तिन्ही वृद्धांनीं विनंति केल्याप्रमाणें दैत्यानें व्यापाऱ्याला जीवदान दिलें आणि त्याला मुक्त केलें. नंतर तिन्ही वृद्धांच्या सल्ल्याप्रमाणें दैत्यराजानें आपल्या मंत्रविद्येनें हरिणी, दोन कुत्रे आणि घोडी यांस मानवी रूपांत आणलें.

मनुष्यरूपांत येतांच पहिल्या वृद्धाच्या पत्नीनें आपल्या पतीची, दुसऱ्या वृद्धाच्या दोन भावांनीं आपल्या छोटया भावाची आणि दैत्यराजानें तिसऱ्या वृद्धाच्या पत्नीची म्हणजेच आपल्या बहिणीची क्षमा मागितली. अशाप्रकारें तेथील सर्वांनीं दैत्यराजाकडे दोन दिवस पाहुणचार घेऊन त्याचा निरोप घेतला.

-समाप्त-

प्रत्येक कुटुंबाच्या संग्रहीं असलींच पाहिजे अशी
अत्यंत वाचनीय तशींच अतीव चित्ताकर्षक
अशीं महान् संस्कारी २ पुस्तकें

१ गोष्टीरूप रामायण

२ गोष्टीरूप महाभारत

• भरपूर चित्रांनीं सालंकृत केलेलीं ० प्रातर्दर्शनीय मुख-पृष्ठांनीं नटविलेलीं ० आशयपूर्ण मनोरंजक कथांनी भरलेलीं ० आणि तरीहि प्रत्येकीं किमत अवघी ५० पैसे

आपल्या जवळच्या विक्रेत्याकडे मागा

–: अगर लिहा :–

रम्यकथा प्रकाशन

३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणें ३०.

आमचीं बालवाङमय व अद्भुतरम्य पुस्तकें
मिळण्याचीं मुंबईतील प्रमुख ठिकाणें

मे. सेंट्रल प्रकाशन

७ पाववाला स्ट्रीट, न्यू चर्नी रोड, मुंबई ४.

सुखसागर पुस्तकालय

पी. टी. हायस्कूलजवळ, दादीशेट अग्यारी लेन, मुंबई ४.